पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिति ***

कार्यपत्रिका क्रमांक ७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ५/५/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७२**

मा.संजय भोसले व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. २७/४/२००९ चे पत्र.

वॉ.क्रं.२१ मधील खालील कामे करणेकरिता रक्कम रू.४० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, (यादी क्रं.एस-२), पान क्रं. २२७,अ.क्रं. ५४, वॉ.क्रं.२१ आदर्श सोसायटी,रामनगर ते पांडूलमाण वस्ती दरम्यानचा खाणीचा धोकादायक डोंगराचा भाग काढून ग्लायटींग प्लास्टर करणे. | ४० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉ.क्रं.२१ गुरूव्दारा व डॉ.पाटील दवाखाना शेजारी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉक्रिटीकरण करणे | --- | १० लाख |
| २)लक्ष्मीनगर येथे पोलीस चौकी समोरील भागात जयशक्ती मंडळ परिसरात १८ इंची व १२ इंची ड्रेनेज लाईन टाकणे व कॉक्रिटीकरण करणे | --- | १० लाख |
| ३) जयजवाननगर येथे रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ४)जयजवाननगर व विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७३**

मा.संजय भोसले व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. २७/४/२००९ चे पत्र.

वॉ.क्रं.२१ यु.पी.हॉटेल व शादलबाबा येथे कॉंक्रिटीकरण करणेकरिता रक्कम रू.१० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, पान क्रं.२६०, यादी क्रं.एस-१९ सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, अ.क्रं ४, वॉ.क्रं.२१ मध्ये यु.पी.हॉटेल येथे जुनी शौचालये काढून त्या ठिकाणी सुलभ शौचालये बांधणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉ.क्रं.२१ यु.पी.हॉटेल व शादलबाबा येथे कॉंक्रिटीकरण करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७४**

मा.संजय भोसले व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. २७/४/२००९ चे पत्र.

वॉ.क्रं.२१ जयजवाननगरमधील श्रीकृष्ण मंदिर ते अमर हार्डवेअर दरम्यान ड्रेनेज लाईन टाकणेकामी खालीलप्रमाणे रक्कम रू.१५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे क अंदाजपत्रक, पान क्रं. ३७, यादी क्रं. पी२डी, पाण्याची लाईन टाकणे , अ.क्रं. ७, येरवडा पर्णकुटी चौक ते चंद्रमा ५०० मि.मी.व्यासाची पाण्याची लाईन टाकणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉ.क्रं.२१ जयजवाननगरमधील श्रीकृष्ण मंदिर ते अमर हार्डवेअर दरम्यान ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १५ लाख |

Unregistered

**विषय क्र. ७५**

मा.संजय भोसले व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. २७/४/२००९ चे पत्र.

वॉ.क्रं.२१ जयजवाननगर (१) रामनगर गोपाळ गणेश मित्र मंडळ जवळील सुलभ शौचालय बांधणे, (२) रामनगर येथील समाजमंदिराचे उर्वरित काम पूर्ण करणे (३) लक्ष्मीनगर पोलिस चौकी समोरील सुलभ शौचालय बांधणे कामी खालीलप्रमाणे रक्कम रू. ३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, पान क्रं. २५८,यादी क्र. जी १, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, अ.क्र. २८, रामनगर येथील सुलभ शौचालयाचे काम करणे | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| (१) रामनगर गोपाळ गणेश मित्र मंडळ जवळील सुलभ शौचालय बांधणे | --- | १० लाख |
| (२) रामनगर येथील समाजमंदिराचे उर्वरित काम पूर्ण करणे | --- | १० लाख |
| (३) लक्ष्मीनगर पोलिस चौकी समोरील सुलभ शौचालय बांधणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७६**

मा.संजय भोसले व मा.शिवाजी शिंदे यांचे दि. २७/४/२००९ चे पत्र.

वॉ.क्रं.२१ मधील खालील कामे करणेकरिता रक्कम रू.१३ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, (यादी क्रं.एस-२९), शहरातील विविध भाजी मंड्यामध्ये विकास कामे करणे, पानक्रं.२५७, अ.क्रं.४, वॉ.क्रं.२१ मध्ये सादलबाबा ते चंद्रमा हॉटेल या १२५ फुटी रस्त्यादरम्यान रस्ता रूंदीमध्ये बाधीत झालेल्या लायसन्स धारकासाठी व हातगाडी धारकासाठी गाळे बांधणे,त्यांचे पुनर्वसन करणे. | १३ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉ.क्रं.२१ सादलबाबा स्प्राटन लक्झरी जवळील प्रवेशद्वाराचे उर्वरीत काम करणे. | --- | ३ लाख |
| २) जयजवाननगर डॉ.शहा समोरील सुलभ शौचालयावर केअरटेकरसाठी खोली बांधणे.दुरूस्ती व रंगरंगोटी करणे. | --- | ४ लाख |
| ३) आदर्श सोसायटी येथील सुलभ शौचालयाचे उर्वरित कामे करणे | --- | ३ लाख |
| ४)जयजवाननगर मधील राजमुद्रा प्रतिष्ठान समाज मंदीराचे काम करणे | --- | ३ लाख |

**विषय क्र. ७७**

मा.शंकर उर्फ बंडु केमसे व मा.सौ.विद्या भोकरे यांचे दि. २८/४/२००९ चे पत्र.

बावधन खुर्द स.नं. १३, १४, १६, १७ पैकी ९ मिटर डी.पी.रस्त्यासाठी आरक्षित असणाऱ्या जागेचा ताबा त्वरीत तडजोडीने अथवा भूसंपादन कायद्याने संपादन करण्यात यावे.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ७८**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ६/१२/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ४/४/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/४३ दि. २४/४/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १६,३१,७९९/- चा तक्ता माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. ७९**

विकास योजना विभागाच्या बाणेर बालेवाडी भागातील सन २००८-०९ मधील लेआऊट प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/४० दि. २४/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १३ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

Unregistered

**विषय क्रं. ८०**

करआकारणी व करसंकलन खात्याकडील सन २००७–०८ मधील एरंडवणा विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/४१ दि. २४/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १४ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्रं. ८१**

पुणे मनपाच्या विविध खात्यांकडे कनिष्ठ अभियंता (सिव्हील/विद्युत) या पदावरील उमदेवारांच्या ६ महिने मुदतीकरीता करार पध्दतीने घेतलेल्या सेवा कराराबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उका/से/३१ दि. २७/४/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ८२**

श्री.विलास सिताराम कांबळे, हुद्दा–झाडुवाला, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय यांची दि. ३/१०/२००८ रोजी पूर्ण झालेली दुसरी सहामाही मनपा सेवा नियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ/से/३४ दि. २८/४/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ८३**

श्री.शंकर बापू थोरात, हुद्दा–सि.ग्रेड लेखनिक, पंडित नेहरु स्टेडियम विभाग यांच्या निलंबन कालावधीस दि. २/१/२००९ रोजी तिसरी सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवा नियम क्र. ५८ नुसार निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(से)/३५ दि. २८/४/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ८४**

श्री.बाळू सहदेव आरणे, हुद्दा–कचरा मोटार बिगारी, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय यांची दि. १६/९/२००८ रोजी पूर्ण झालेली दुसरी सहामाही मनपा सेवा नियम क्र. ५८ नुसार निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(से)/३६ दि. २८/४/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ८५**

श्री.विनोद मधुकर अवचर, हुद्दा–झाडुवाला, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय यांची दि. २५/२/२००९ रोजी पूर्ण झालेली पहिली सहामाही मनपा सेवा नियम क्र. ५८ नुसार निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ/से/३७ दि. २८/४/२००९ चे पत्र.

UnRegistered

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. ८६**

Development of Geographical Information System For Pune Municipal Corporation कामी निविदा मागविली असता आलेल्या ४ निविदांपैकी ३ निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्या असून RMSI Pvt Ltd या कंपनीने दिलेला दर सर्वात कमी असल्याने त्यांना वर्कऑर्डर देणेस व सदर कामापोटी येणारा खर्च र.रुपये २,१४,४९,८८६/– (र.रुपये दोन कोटी चौदा लाख एकोणपन्नास हजार आठशे श्याऐंशी फक्त) RMSI Pvt Ltd या कंपनीस आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/सांसं/१६ दि. १७/४/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ८७**

वारजे जलकेंद्र येथे जलशुध्दीकरण केंद्र उभारणे – टप्पा क्र. २ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.जिओ मिलर आणि कंपनी प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,०७,७३,६८१/– पेक्षा १३.२७१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६६,९१,७५,२५६=२० अधिक भाववाढ सुत्रानूसार येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/पापु/प्र/३३ दि. २७/४/२००९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. ८८**

नगरसचिव कार्यालयाकडील श्री.शेवाळे राजेंद्र हरिभाऊ, हुद्या ज्येष्ठ समिती लेखनिक (वेतनश्रेणी रुपये ५१५० ते ११३५०) यांनी स्वत:चे टेबलाचे काम सांभाळून कार्यालयीन कामाच्या सोईसाठी अति.कार्यालय अधिक्षक (वेतनश्रेणी रुपये ५३०० ते ११८००) या पदाचे काम दि. १/६/२००८ ते २५/२/२००९ पर्यंत पाहिले असल्याने त्यांना उपरोक्त कालावधीचे मान्य धोरणानुसार ५% विशेष वेतन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. ६०२० दि. १२/३/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १७/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ८९**

नगरसचिव कार्यालयाकडील श्री.समेळ शरद एकनाथ, नगरसचिव (वेतनश्रेणी रुपये १०६५० ते२२१५०+स्पेशल पे+मोटारकार अलौन्स) यांचे रजा मुदतीत कार्यालयीन कामाच्या सोईसाठी श्री.पारखी सुनिल नारायण, उपनगरसचिव (वेतनश्रेणी रुपये ६५०० ते १४७५०) यांनी स्वत:चे टेबलाचे काम सांभाळून नगरसचिव या पदाचे काम पाहिले असल्याने दि. २०/८/२००८ ते १९/९/२००८ पर्यंत मान्य धोरणानुसार ५% विशेष वेतन व मोटारकार अलौन्स देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. ६०२१ दि. १२/३/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १७/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९०**

मा.विरेंद्र किराड व मा.अशोक येनपुरे यांचे दि. ९/१/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १८३७ दि. ६/१/२००९ चा फेरविचार करण्यात यावा. (आकाशचिन्ह व जाहिरात फलक यांच्या फी चे दरात वाढ करणेबाबत)

सदर ठरावाचा फेरविचार होईपर्यंत मा.महापालिका आयुक्त यांनी कार्यवाही करु नये तसेच सदरचा ठराव १ के खाली मा.मुख्य सभेत दाखल करु नये.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १७/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ९१**

श्री.एरंडे राजेंद्र पुरुषोत्तम यांची विशेष कार्याधिकारी, सांख्यिकी म्हणून दि. १७/३/२००९ पासून ६ महिने मुदतीकरीता र.रुपये २५,०००/- दरमहा एकवट मोबदल्यावर करार पध्दतीने घेण्यात येत असलेली सेवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उका/स/२८ दि. २१/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९२**

पं.नेहरु स्टेडियम येथील हॉटेल सारस रेस्टॉरंट, २१ निवासी खोल्या, १ कॉन्फरन्स हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स या तत्वावर दरमहा भाडे र.रुपये १,२९,४१३/- प्रथम वर्षासाठी निर्धारित करुन व त्यानंतर प्रतिवर्षी १२% भाडेवाढ प्रस्तुत करुन ५ वर्षे चालविण्यास देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त रक्कमेची निविदा देणारे श्री.सतिश शेट्टी (विनय केटरर्स) यांना पाच वर्षाकरीता लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दरमहा र.रुपये २,००,०५३/- प्रथम वर्षी व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करुन देण्यास तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल त्या दिनांकापासून अगर प्रत्यक्ष ताबा दिनांकापासून त्यांचेबरोबर करार करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(सक)/१५०६ दि. २७/२/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

UnRegistered

**विषय क्रं. ९३**

मा.स्थायी समिती ठराव क्र. २८३ दि. २७/५/२००८ सभा क्र. १५ एकात्मिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प बी.ओ.ओ.टी. तत्वावर येवलेवाडी येथे राबविणेस पुणे वेस्ट मॅनेजमेंट कंपनी प्रा.लि. यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत या विषयाचा फेरविचार करुन मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/घनकचरा/१९ दि. १७/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ९४**

१४ प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी या १४ प्रभाग समित्यांची विशेष सभा श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (पुणे मनपा सभागृह) येथे दि. ९ एप्रिल २००९ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजता या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी सर्व मा.सभासद व अधिकारी यांचेसाठी भोजन व्यवस्था करावी असे तोंडी आदेश मा.महापौर यांनी दिले होते. त्यानुसार सदर भोजन व्यवस्था मे.श्रेयस केटरर्स, पुणे यांचेमार्फत करण्यात आली होती.

तरी मे.श्रेयस केटरर्स, पुणे ४ यांनी भोजन व्यवस्था समाधानकारक केली असल्याने त्यांनी सादर केलेले र.रुपये २४,८४२/- चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. १४७ दि. २८/४/२००९ चे पत्र.

१.मुख्य देखरेख वसुली वगैरे, क.महानगरपालिका व स्थायी समिती, १.नगरसचिव यांचे कार्यालय, २१.विशेष समिती सभा चहापान खर्च, सन २००९-१० मान्य तरतुद र.रुपये १.२५ लाख.

**विषय क्र. ९५**

पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत स्थापन झालेल्या एन.एम.टी.सेल व आय-सी.ई. नेदरलॅण्ड यांच्यातर्फे दि. ६ मार्च २००९ व दि. ७ मार्च २००९ रोजी दोन दिवसांची **Cycle Inclusive Planning for Indian Cities** या विषयावरील कार्यशाळा ही यशदा, बाणेर रस्ता याठिकाणी घेण्यात आली असून कार्यशाळेसाठी उपस्थित राहिलेल्या प्रतिनिधींनी स्वतः त्यांच्या राहण्याचा खर्च केला असून पुणे महानगरपालिकेतर्फे क्लासरुमचा तसेच दोन दिवसांच्या ब्रेकफास्ट व दुपारच्या जेवणाचा खर्च करण्यात आला आहे. त्यासाठी झालेल्या र.रुपये ५४,८२७/- एवढ्या खर्चास पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/३८ दि. २९/४/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ९६**

मा.स्थायी समिती अंदाजपत्रक सभा प्रसंगी मा.सभासद व अधिकारी व सेवक यांचेसाठी शाकाहारी व मांसाहारी भोजन व्यवस्था स्थायी समिती सभागृह येथे दि. २७/१/२००९ रोजी करण्यात आली होती. सदर व्यवस्था मे.जय केटरर्स, बुधवार पेठ, पुणे २ यांनी केलेली असून ती समाधानकारक केली असल्याने त्याप्रित्यर्थ त्यांनी सादर केलेले र.रुपये १०,६१८/- चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. १७० दि. ३०/४/२००९ चे पत्र.

१.मुख्य देखरेख वसुली वगैरे, क.महानगरपालिका व स्थायी समिती, १.नगरसचिव यांचे कार्यालय, २०.स्थायी समिती सभा चहापान खर्च, सन २००९-१० मान्य तरतुद र.रुपये ३ लाख.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered

## स्थायी समिति

## दाखल विषय – दि. ५/५/२००९

**विषय क्र. ९७**

मा.सौ.अश्विनी कदम व मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. ५/५/२००९ चे पत्र.

कात्रज–हडपसर या मार्गावरील बी.आर.टी.प्रकल्पांतर्गत सायकल ट्रॅक, फुटपाथ तदनुषंगिक काम रेलकॉन या एजन्सीला देण्यात आले आहे. सदर एजन्सीने वरील काम दिलेल्या मुदतीत काम पुर्ण केलेले नाही. तसेच काम करीत असता नागरिकांच्या दृष्टीकोनातून सुरक्षतेची कोणतेही उपाय योजना केल्या नसल्यामुळे दोन ते तीन जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

तरी वरील कारणांमुळे रेलकॉन या एजन्सीवर कडक कारवाई करण्यात यावी.

UnRegistered

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**